सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र.पोमसं/३६/र.वका.(८३००)शा.नि.-अधिसूचना/०१/२०२६, मुंबई, दि. ई.स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ**:- महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक स्मारक प्र. क्र. ३०८/कार्या- २९, दि. २०/०३/२०२६

**विषय**:- बालकल्याण पोलीस अधिकारी (CWPO) व विशेष बाल पोलीस पथक (SJPU) मधील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांना प्रशिक्षण देणेबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक SDC-२०२६/ C.R.३०/IT/२०२४/कोषा.प्रशा-५,दि.२०/०३/२०२६,ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०३२०१११८५२११२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
CHANDRASHEKHAR GOVINDRAO SHINDE
Date: 24-03-2026 14:52:10

( चंद्रशेखर शिंदे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व.का) (अति.कार्यभार )
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई. (सस्नेह)
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई(सस्नेह).
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक,(आस्थापना/कायदा व सुव्यवस्था /आर्थिक गुन्हे/दहशतवाद विरोधी पथक/ विशेष कृती/ प्रशासन/ वाहतूक/ प्रशिक्षण व खास पथक फोर्स वन नागरी हक्क संरक्षण/ सायबर सुरक्षा / रा.रा.पो.बल / महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग), महाराष्ट्र राज्य
नक्षल विरोधी अभियान, नागपूर.
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना/ कायदा व सुव्यवस्था/ प्रशासन/ प्रशिक्षण व खास पथके), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.
संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे.

सर्व पोलीस अधीक्षक ( गुन्हे/ बिनतारी संदेश/लोहमार्ग).
पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.
सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्र.
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते २०
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु. / दक्षता/ धोरण/ नि.व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे सर्व वरिष्ठ उप सहायक / उपसहायक.
सर्व कार्यासन अधिकारी, का.क्र १ ते ४४

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय/परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**बालकल्याण पोलीस अधिकारी (CWPO) व विशेष बाल पोलीस पथक (SJPU) मधील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांना प्रशिक्षण देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः पोलीस ११२६/प्र.क.८०/पोल-५अ**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- २० मार्च २०२६

**वाचा :-**

१) विशेष पोलीस महानिरीक्षक (नाहस व मअप्रवि), पोलीस महासंचालक यांचे पत्र क्र. विपोमनि/नाहस व मअप्रवि/बाल पोलीस पथक /४४/२०१८, मुंबई दि.१४.०२.२०१८

२) अपर पोलीस महासंचालक, महिला व बाल अपराध प्रतिबंध विभाग,मुंबई यांचे परिपत्रक क्र. पमोसं/४२(२)/मबाअप्रवि/फा.क्र.९०/२०२५,मुंबई,दि.२६.११.२०२५

३) मा. मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथील सुमोटो क्रमिनील जनहित याचिका क्र. १/२०२५ प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दिलेले आदेश दि.१०.०२.२०२६

४) अपर पोलीस महासंचालक, महिला व बाल अपराध प्रतिबंध विभाग,मुंबई यांचे पत्र क्र. पमोसं/४२/मबाअप्रवि/२/प्र.क्र.९०/२०२५,मुंबई,दि.२५.०२.२०२६

**प्रस्तावना :-**

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ च्या, कलम १०७ अन्वये, राज्यातील सर्व पोलीस घटकस्तरावर, विशेष बाल पोलीस पथक (SJPU-Special Juvenile Police Unit) स्थापन करण्यात आले आहे. तसेच, राज्यामध्ये प्रत्येक पोलीस स्टेशन स्तरावर, बालकल्याण पोलीस अधिकारी (CWPO-Child Welfare Police Officer) यांची नेमणूक करण्यात आली आहे. बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम, २०१८ मधील, नियम ९२ अन्वये, या पथकांमधील कार्यरत पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे नियमीत प्रशिक्षण होणे अपेक्षीत आहे.

मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद मधील Suo-Moto Criminal PIL No.१/२०२५ मध्ये, दि.१०.०२.२०२६ रोजीच्या आदेशात, CWPO व SJPU मध्ये कार्यरत असलेल्या पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांची बदली झाल्यानंतर, नविन ठिकाणीही त्यांना तेच कर्तव्य देणेबाबत तसेच, एकंदरीत सर्व प्रक्रिया व निर्णय यांमध्ये एकसंधता राहण्यासाठी, पोलीस दलामध्ये नवनियुक्त पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांना, संस्थात्मक पातळीवरच (अॅकडमी स्तरावर) प्रशिक्षण देणेबाबत शासन स्तरावर धोरणात्मक निर्णय घेण्याचे निर्देश दिले आहेत.

**शासन निर्णय:-**

मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशाच्या अनुषंगाने, खालील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

१. अपर पोलीस महासंचालक, (प्रशिक्षण व खास पथके) यांनी, CWPO व SJPU मध्ये कार्यरत असलेल्या पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांच्या प्रशिक्षणाकरीता, एक विशेष प्रशिक्षण मॉड्यूल (Specialized Training Module) तयार करावे.

२. राज्य पोलीस दलाच्या सर्व शिखर प्रशिक्षण संस्था व इतर प्रशिक्षण संस्थांच्या, पायाभूत प्रशिक्षण अभ्यासक्रमात (Basic Training Curriculum) व उजळणी प्रशिक्षण अभ्यासक्रमात (Refresher Training Curriculum) सदर विशेष प्रशिक्षण मॉड्यूलचा समावेश करणे अनिवार्य राहील.

३. उपरोक्त प्रमाणे प्रशिक्षण घेतलेल्या पोलीस अधिकारी व अंमलदार यांनाच CWPO व SJPU मध्ये पदस्थापना देण्यात यावी.

४. CWPO व SJPU मध्ये नव्याने पदस्थापना झालेल्या पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी, सदरचे प्रशिक्षण घेतलेले नसल्यास, त्यांना पदस्थापनेच्या, एका महिन्यात सदर प्रशिक्षणास पाठविण्यात यावे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०३२०१११८५२११२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by RAVINDRA NAMDEV PATIL
Date: 2026.03.20 11:19:51 +05'30'

**( र. ना. पाटील )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. अपर पोलीस महासंचालक, महिला व बाल अपराध प्रतिबंध, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३. अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई
४. सर्व पोलीस आयुक्त
५. सर्व पोलीस अधीक्षक
६. महालेखापाल (लेखापरिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र,१/२ मुंबई/नागपूर
७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
९. निवडनस्ती (पोल-५अ)